**MHTH250124502024**

**<u>निशाणी क्र. ४२ खालील आदेश</u>**

१. वादी यांनी प्रस्तुतचा दावा उद्घोषणा आणि मनाईहुकूम मिळणेकामी दाखल केला आहे. प्रतिवादी क्र.६ यांनी प्रस्तुतचा अर्ज त्यांना आपली लेखी कैफीयत दाखल करण्यास झालेला विलंब माफ होउन मिळणेकरीता दिलेला आहे. सदर अर्जास वादी यांनी हरकत घेतलेली आहे. अर्ज व म्हणणे अभिलेखासह वाचले. सोबत दोन्ही पक्षकारांचा युक्तीवाद ऐकला.

२. प्रतिवादी यांचे असे म्हणणे आहे की, दाव्यामध्ये हजर झाल्यानंतर त्यांना मुदतीमध्ये आपली लेखी कैफीयत दाखल करणे आवश्यक होते. परंतु, दाव्यासबंधी आवश्यक व महत्वाची कागदपत्रे प्राप्त करण्यास त्यांना उशीर झाल्यामुळे त्यांना आपली लेखी कैफीयत मुदतीमध्ये दाखल करता आली नाही व त्यांना ३८९ दिवसांचा विलंब झाला. प्रतिवादी यांचे अर्जातील कारण संयुक्तीक दिसनु येत नाही. तथापी, प्रतिवादी यांनी दाव्यामध्ये आपली लेखी कैफीयत प्रस्तुत अर्जासोबत सादर केली आहे. त्यामुळे हे स्पष्ट होते की, प्रतिवादी यांना दावा आव्हानीत करण्यास इच्छा व स्वारस्य आहे. जर, प्रतिवादी यांना संधी दिली नाही तर, दाव्याचा गुणदोषावरती निवाडा होणार नाही व प्रकरणाची गुंत्तागुंत व बहुगुणीत्ता वाढणार आहे. सबब, प्रतिवादी यांना संधी देणे न्यायोचीत ठरणार आहे. तसेच, प्रतिवादी यांचा नि.क्र. ४० वरील अर्ज खर्च आकारून मंजुर केला आहे. परीणामी खालील आदेश पारीत करण्यात येत आहे.

**: आदेश :**

१. अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. दोन्ही पक्षांनी आदेशीची नोंद घ्यावी.

UDAY SAHEBRAO JADHAV
Digitally signed by UDAY SAHEBRAO JADHAV
Date: 2026.07.27 17:23:40 +0530

**वसई** **( यु.एस. जाधव )**
**दि. २७.०७.२०२६** **सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर वसई**